Journal details from UGC website.

## Journal Details

| | |
|---|---|
| **Journal Title (in English Language)** | Tifan (print only) \| (Current Table of Content) |
| **Journal Title (in Regional Language)** | टिफण (print only) |
| **Publication Language** | Marathi |
| **Publisher** | Tifan |
| **ISSN** | 2231-573X |
| **E-ISSN** | NA |
| **Discipline** | Arts and Humanities |
| **Subject** | Language |
| **Focus Subject** | Marathi |

IQAC OFFICE
K.V.N. Naik Arts, Commerce & Science College

Co-ordinator
I.Q.A.C.
KVN Naik Arts, Commerce
& Science College, Canada Corner,
Nashik-422 002.

Co-ordinator
I.Q.A.C.
KVN Naik Arts, Commerce
& Science College, Canada Cor...,
Nashik-422 002.

**Copyright © 2021 Savitribai Phule Pune University. All rights reserved. | Disclaimer**

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १० वे | अंक - ४ था | जानेवारी ते मार्च - २०२०

भाग - ३

**UGC CARE Listed Journal**
**ISSN 2231-573X**

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

❖ संपादक ❖

**डॉ. शिवाजी हुसे**
मराठी विभाग प्रमुख
शिवाजी महाविद्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद.

वर्ष - १० वे - अंक - चौथा - जानेवारी ते मार्च - २०२०
तिफण - ISSN 2231 - 573X

# २१. स्त्रियांची सामाजिक स्थिती आणि संत कवयित्रींचे वाङ्मयीन कार्य

प्रा. डॉ. राजेंद्र रामकृष्ण सांगळे
मराठी विभाग, के. व्ही. एन. नाईक महाविद्यालय, नाशिक.

**प्रास्ताविक**

मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे, असे प्रसिद्ध विचारवंत ॲरिस्टॉटल म्हणतो. समुहात वावरणे, उठणे, बसणे आणि समुहाने राहणे ही मानवाची नैसर्गिक प्रवृत्ती आहे. भौतिक गरजा पूर्ण झाल्यानंतर माणसाने भावनिक गरजेच्या पूर्तीसाठी सामाजिक बंधन निर्माण केले आणि आपली प्रगती साध्य केली. सामाजिक संबंध हे काही काळ स्थिर असले तरी परिवर्तनशील असतात. त्यात सातत्य असते. या संबंधाच्या नियमातून कुटुंब, विवाह, धर्म इ. सामाजिक संस्थांचा जन्म होतो आणि त्यांचा विकास होतो. म्हणून सामाजिक अभ्यास करताना सामाजिक संबंधांचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

प्रत्येक समाजाचे स्वत:चे काही कायदे, नियम आणि आदर्श असतात. परंपरेने चालत आलेले रूढी, विधी, सण, उत्सव यांचे सामाजिक नियमन समाजात काटेकोरपणे होत असते. यातून सामाजिक नियमांची निर्मिती होते. हे नियम मोडणारा समाजाकडून बहिष्कृत केला जातो आणि नियम पाळणारे एकत्र येऊन समाज निर्माण होतो. त्यातून सामाजिकमूल्ये, परंपरा या आधारे व्यक्तीच्या वर्तनावर नियंत्रण मिळविले जाते. या पार्श्वभूमीवर भारतीय समाजाचा विचार करता स्त्रीचे स्थान नेमके कसे होते ? आणि संत कवयित्रिंचे वाङ्मय व त्यांचे सामाजिक योगदान काय होते याची चर्चा प्रस्तुत शोधनिबंधात करता येईल.

**भारतीय समाज व स्त्रिया**

'समाज' या संकल्पनेत 'कुटुंब' या घटकास विशेष महत्त्व आहे. कुटुंबात पुरूषांबरोबर आई, बहीण, सासू, सून, मुलगी, सवत, नणंद असा अनेक नात्यांनी स्त्री वावरत असते. कधी ती सौभाग्यवती तर कधी ती विधवा असते. विसाव्या शतकापासून स्त्रियांच्या जीवनात थोड्याफार प्रमाणात बदल होवू लागले. मात्र प्राचीन भारतीय स्त्रीच्या स्थानाचा विचार करता, सुरूवात वेदकाळापासून करावी लागेल. भारतीय स्त्रीच्या जीवनावर विविध घटकांचा बरा वाईट परिणाम त्या त्या काळात झालेला दिसून येतो. प्राचीन काळात मातृसत्ताक पद्धतीत स्त्रीला काही विशिष्ट मर्यादेपर्यंत स्वातंत्र्य होते. पण पितृसत्ताक कुटुंबपद्धतीत तिला अनेक वाईट परिणाम भोगावे लागले. स्त्रियांना हीन लेखण्याची आणि दुय्यम वागणूक देण्याची सुरूवात येथूनच झाली. वैदिक काळात स्त्री पुरूषांच्या वर्तनाचे काही नियम करण्यात आले होते. कुटुंब या घटकाला तत्कालीन सामाजिक जीवनात महत्त्वाचे स्थान होते. मात्र पुरूषप्रधान संस्कृती असल्याने जीवनाच्या सर्व क्षेत्रात स्त्रीला दुय्यम वागणूक देवून तिला हीन लेखले जाई. आपल्याला मुलगाच व्हावा म्हणून वैदिक काळात पुत्रकामेष्टीसारखे विधी केले जात. मुलीचा जन्म क्लेषकारक आणि वाईट मानला जाई. पुत्रप्राप्तीशिवाय मोक्ष नाही अशी तत्कालीन समाजाची धारणा याच काळात दिसून येते. या काळात अर्थव्यवस्था फारशी विकसित नसल्याने स्त्रीच्या आर्थिक स्वातंत्र्याच्या प्रश्न याच काळात नसावा. या काळात अर्थव्यवस्था फारशी विकसित

नसल्याने स्त्रीया अविवाहितदेखील राहत असत. विवाहाच्या वेळी मुलामुलीतील वयाचे अंतर बरेच जास्त असे. लग्नविधी लवकरात लवकर उरकून मुलीच्या जबाबदारीतून मुक्त होण्याचा प्रघात या काळात दिसून येतो. बालविवाहांमुळे तत्कालीन स्त्रियांना अनेक वाईट परिणामांना सामोरे जावे लागत होते. लवकर लग्न झाल्याने पतीचे लवकर निधन झाले तर अकाली वैधव्य येत असे.. पुनर्विवाहास संमती नसे. त्यामुळे समाजात बालविधवांचे प्रमाण वाढून त्यांची स्थिती अत्यंत वाईट होई.

वेदकाळात समाजात एकत्र कुटुंबपद्धती अस्तित्वात होती. एकापेक्षा अधिक लोक पिढ्यानपिढ्या एकाच कुटुंबात राहत. 'पितृसत्ताकपद्धती' मुळे स्त्री-पुरूष आपली कामे करीत. आर्य भारतात येण्यापूर्वी काही समाजात 'मातृसत्ताक पद्धत' प्रचलित होती. प्राचीन संस्कृतीमध्ये काही काळ 'मातृसत्ताक पद्धती' अस्तित्वात असल्याने स्त्रीला समाजात मानाचे स्थान होते. स्त्रीचा दर्जाही या काळात उच्च होता. या काळात एकपत्नीत्वाची चाल असली तरी बहुपत्नीत्वाची काही उदाहरणे दिसून येतात. मुलींना शिक्षण दिले जात होते. स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने 'यज्ञविधी' चें अधिकार प्राप्त होते. गरजेपुरते वेदमंत्र शिकण्याचाही त्यांना या काळात अधिकार होता. मात्र आर्यांच्या आक्रमणानंतर मूळ निवासी असलेले 'अनार्य' पराभूत झाले आर्यांनी 'मातृसत्ताक पद्धती' दडपून टाकण्याचा भरपूर प्रयत्न केला. आर्यांच्या आक्रमणापूर्वी या भूमीत 'मातृसत्ताक पद्धती' ने सामाजिक व्यवस्था कार्यरत होती आणि स्त्रियांना नंतरच्या काळापेक्षा जास्त मान, सन्मान आणि स्वातंत्र्य होते.

आर्य अनार्यांच्या संघर्षानंतर स्त्रियांवरील अत्याचारांत वाढ झाली. वंशशुद्धता आणि स्त्रियांवरील अत्याचार यामुळे स्त्रियांवर कडक बंधने आली. तिचे लग्नाचे वय कमी होवून तिला शिक्षणापासून वंचित ठेवले जावू लागले. पुरूषांचे वर्चस्व वाढत जावून 'चूल आणि मूल' एवढेच तिचे विश्व मर्यादित झाले. तिच्यावर अधिकाधिक कौटुंबिक जबादाऱ्या देवून तिला जाणीवपूर्वक घरात गुंतवून ठेवण्याचे धोरण पुरूषप्रधान समाजाने स्वीकारले. 'मनुस्मृती' च्या काळात स्त्रीच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंतचे आयुष्य नियंत्रित करणाऱ्या संहिता तयार झाल्या. विवाहानंतर स्त्रीने आपल्या पित्याचे घर सोडून पतीच्या घरी जाण्याची पद्धत निर्माण झाली. ज्या पुरूषाशी लग्न लावले त्याला पतीपरमेश्वर मानून मरेपर्यंत त्याच्याच सेवेत राहावे, असे धर्मशास्त्राचे आदेश त्या काळात होते.

तिच्या दैनंदिन आचरणावरही मर्यादा आणि बंधने आली. सासरी तिने सर्वांच्या आधी उठावे, सर्वांच्यानंतर झोपावे, पतीच्या पूर्वी भोजन करू नये, माणसांमध्ये येवून बोलण्यात भाग घेऊ नये. सासरच्या लोकांशी वाद घालू नये, असे संकेत तत्कालीन समाजव्यवस्थेत स्त्रीच्या बाबतीत रूढ झाले. तिला दासीचा दर्जा मिळाला. तिच्या हसण्यावरही धर्मशास्त्रांनी बंदी आणली. स्त्रीने पूर्ण वस्त्रे परिधान करावे, पतीने मारहाण केल्यास ती हसतमुखाने सहन करावी. ऋग्वेदात स्त्रीविषयी एके ठिकाणी म्हटले आहे, "तू खाली पहा, वर पाहू नकोस; कारण तू स्त्री आहेस. स्त्री ही पतीच्या सावलीसारखी असते."[२] अशा रितीने स्त्रीला शुद्रासारखी वागणूक मिळू लागली. या काळात स्त्रीला संपत्तीचे , धनाचे अधिकार नव्हते. स्त्री ही पुरूषांच्याच संपत्तीचा एक भाग आहे, असे मानले जाई. कालांतराने तिला स्त्रीधनाच्या नावाखाली मर्यादित स्वरूपात संपत्तीचे अधिकार देण्यात आले.

स्त्रियांचे विवाह वेगवेगळ्या पद्धतीने करण्याची या काळात पद्धत होती. ब्राम्ह, दैव, आर्ष, प्राजापत्य, आसून, गांधर्व, राक्षस आणि पैशाच अशा आठ प्रकारचे विवाह त्या काळात होत. पतीच्या निधनानंतर झालेल्या विधवा स्त्रीला विधवा सती जावे लागे. मूळची क्षत्रियांमध्ये असलेली ही प्रथा नंतर सामान्यांमध्येही प्रचलित झाली. सती जाणे हे पुण्यकर्म ठरून पुढे सतीला समाजमान्यता मिळाली. यानंतरच्य मुघल काळात स्त्रीया जीवनातही काही विशेष बदल झालेले दिसत नाहीत. उलट स्त्रियांना अधिक जायबंदी केले गेले.

बाबरच्या रूपाने आलेले मुघल भारतात स्थायिक झाले. इथून पुढे हिंदुस्थानचा राजकीय इतिहास जसा बदलला तसा सांस्कृतिक इतिहासही बदलला. याच काळाला 'मध्ययुग' म्हटले जाते. शासकाचा धर्म असलेल्या मुस्लिम धर्मामुळे भारतीय भारतीय समाजव्यवस्थेवर त्याचा प्रत्यक्ष प्रभाव पडून त्याचे अनेक चांगले वाईट परिणाम इथल्या स्त्री जीवनावर झाले.

मध्ययुगात जीवनाच्या विविध क्षेत्रात स्त्रियांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली दिसते. कुटुंबात तिचे स्थान माता, पत्नी, बहीण, कन्या म्हणून महत्वाचे राहत असे. मात्र या काळात धर्मपंडित आणि मुल्ला मौलवींचा प्रभाव अधिक असल्याने स्त्रियांच्या धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनावर मोठी बंधने आली. मध्ययुगात भारतीय स्त्रीचे स्थान प्राचीन काळापेक्षा जास्त खालावले. प्राचीन काळात भारतात पडदा पद्धती नव्हती. मात्र मुसलमानांनी अंमल सुरू झाल्यावर पडदा पद्धत आली. याचा वाईट परिणाम स्त्रियांच्या दैनंदिन जीवनावर झाला. स्त्रियांना घरातल्या घरात बाहेर कठीण झाले. दिल्लीवर मुघलांची सत्ता आल्यानंतर मुस्लिम संस्कृती, परंपरा, चारीरितींचा प्रभाव येथील हिंदू स्त्रीजीवनावरही झाला. संपत्तीबरोबर या काळात स्त्रियांची लूट होऊ लागली. त्यामुळे अधिक कर्मठ आणि सनातनी असलेला हिंदू धर्म अधिकच कडवा झाला. स्त्रियांचा दर्जा घसरण्यास या काळात अनेक सामाजिक, धार्मिक व राजकीय घटकांनी हातभार लावला.

या काळात मुलीचा जन्म अशुभ मानला गेला. कारण धार्मिक कर्मकांडांना या काळात अधिक महत्त्व दिले जावू लागले. पितरांच्या पूजेचा मान मुलीला नसे. तो मुलालाच असे. तसेच प्रेताला अग्नी देण्याचा अधिकारही स्त्रीला नसल्याने वंशाचा दिवा, वारसदार म्हणून मुलाच्या जन्माचे स्वागत होत होते. मुलगी झालीच तर तिला अतिशय कमी वयात बालविवाह करून आईबाप आपल्या जबाबदारीतून मुक्त होत. त्यामुळे समाजात बालविधवांचे प्रमाण वाढत होते. मात्र विधवा विवाहाला शास्त्र अनुमती देत नसे. विधवा मुलगी आईबापांना ओझे वाटे. तिला कुटुंबात आणि समाजात अत्यंत हीन आणि अपमानास्पद वागणूक मिळत असे. पुनर्विवाहाला परवानगी नव्हती. पतीनिधनानंतर बऱ्याच विधवा स्वतःच्या मनाने तर कधी मनाविरूद्ध सती जात.

पुर्वीच्या काळात शिक्षणाची सार्वजनिक अशी व्यवस्था नव्हती. गुरूच्या घरी जाऊन शिक्षण पूर्ण करावे लागे. नाहीतर घरी मुलींना शिकविण्यासाठी शिक्षकाची नेमणूक केली जात असे. मात्र हे सर्व अमीर, उमराव आणि श्रीमंतांच्या मुलांसाठी. गोरगरीब मातापिता आपल्या मुलीला गुरूगृही पाठवित नसत. कारण समाजात स्त्रीने शिक्षण घ्यावे, हा विचारच मान्य नव्हता. इस्लामी संस्कृतीच्या प्रभावाने हिंदू स्त्रीवरही अनेक बंधने आली. पूर्वी मुसलमान स्त्रियांपुरती मर्यादित असलेली 'पडदा पद्धती' हिंदू धर्मातही आली. त्यामुळे स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर बंधले आली. शिवाय कमी वयात लग्न होत असल्याने मुलीच्या शिक्षणाचा प्रश्नच येत नव्हता. त्यामुळे स्त्रियांवरील निरक्षरता, अज्ञान, अंधश्रद्धा वाढून समाजात अडाणी स्त्रियांची संख्या दिवसेंदिवस वाढतच गेली.

तत्कालीन भारतीय समाजात अनेक अनिष्ठ प्रथा आढळून येतात. या प्रथांनी स्त्रियांचे जगणे असहाय्य केले होते. हुंडा प्रथा अशीच एक अनिष्ठ प्रथा होय. मुलीचा बाप प्रसंगी कर्ज काढून किंवा जमीन विकून हुंडा देत असे. स्त्रियांची गुलामांसारखी किंमत ठरविण्याचा हा प्रकार असल्याने हुंडा पद्धतीमुळे स्त्रियांचा सामाजिक दर्जा निश्चितपणे घसरला. बालविवाह ही देखील एक अघोरी प्रथा भारतात अस्तित्वात होती. बालविवाहामुळे स्त्रीला लवकरच वैधव्य येत असे. अशा वैधव्य आलेल्या स्त्रीला सती जाण्यासाठी प्रवृत्त केले जाई. पतीच्या मृत्युनंतर स्त्रीला 'विधवा' म्हणून जगावे लागे. धार्मिक पगडा, कर्मकांड आणि समाजाची सनातनी वृत्ती यामुळे विधवांना अनेक संकटांचा सामना करावा लागत असे. तिला जीवन नकोसे होई. पतीच्या निधनानंतर बऱ्याच स्त्रिया स्वतःच्या मर्जीने पतीच्या चितेवर बसून पतीच्या मृत शरीराबरोबर स्वतःला जाळून घेत, तर कधी कधी नातेवाईक तिला बळजबरीने सती जायला भाग पाडत.

वेदकाळातील तिच्या स्थानाला मध्ययुगात धक्का बसला. स्त्रीला अस्पृश्य व अपवित्र समजले गेले. तिला शिक्षणापासून वंचित ठेवल्याने भारतीय स्त्री अडाणी, परंपरावादी व अंधश्रद्धाळू बनली. विपरित परिस्थितीत व संकटात तिचा देवाधर्मावरील विश्वास वाढला. त्यामुळे स्त्रिया पूजाअर्चा, उपवास, ध्यान, पुराणे, मूर्तीपूजा, दानधर्म, यात्रा अशा कर्मकांडात फसत गेल्या. सण, उत्सव, पूजा यातील तिचा सहभाग वाढला. देवाधर्माचा तिला जगण्यासाठी आधार वाटू लागला. धार्मिक प्रभावामुळे तिचे दैनंदितन आचरणही प्रभावित झाले. स्त्रिया व्रतवैकल्य व उपासतापास करू लागल्या. पतीव्रतेच्या नावाखाली स्त्रीवर अनेक कडक निर्बंध लादले गेले. भोळ्या आणि अडाणी स्त्रियांनी याची कधीच तार्किक चिकित्सा न करता पतीधर्म पालनास महत्व दिले. पतीव्रतेचा धर्म हाच स्त्रीचा खरा धर्म ही शिकवण आणि संस्कार स्त्रियांवर जाणीवपूर्वक बिंबवून तिला धार्मिक बंधनात अडकविण्याचे काम मध्ययुगात मोठ्या प्रमाणात झाले. देवदासी, वाघ्या मुरळीच्या नावाखाली अनेक स्त्रिया देवाला सोडल्या जावू लागल्या. स्त्रीच्या शोषणाचा हा कळस होता. मात्र धर्माच्या नावाने हे सर्व व्यवस्थित सुरू होते. मध्ययुगातील या कठीण स्थितीतही महाराष्ट्रातील स्त्रीला तिचा चेहरा प्राप्त करून देण्याचे श्रेय संत कवयित्रींना द्यावे लागले.

**महाराष्ट्रातील संत कवयित्री**

मध्ययुगात महाराष्ट्रातील स्त्री जीवनाचा विचार करताना महाराष्ट्रातील संत कवयित्रींचे योगदान नाकारून चालणार नाही. बाईपणाच्या दाहक अनुभवांनी त्यांचे लिखाण समृद्ध केले आहे. या काळात संत कवयित्रींची मोठी परंपरा पाहायला मिळते. त्यांच्या लिखाणातून तत्कालीन स्त्री जीवनाचे विविध पैलू समोर येतात. आपल्या साहित्यातून त्यांनी समाजातील अनेक अनिष्ट व वाईट रूढींवर कोरडे ओढले. नुसती टीका न करता 'बुडती हे जन न देखवेना डोळा...' या सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून सामान्य लोकांना दिशा देण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी केले. मध्ययुगात महाराष्ट्रात होवून गेलेल्या महदंबा, मुक्ताबाई, संत जनाबाई, कान्होपात्रा, सोयरा, निर्मळा, लिंबाई, भागू महारीन, बहिणाबाई या संत कवयित्रींचे कार्य आणि सामाजिक योगदान महत्त्वाचे आहे. तत्कालीन समाजजीवनाचा विचार करता स्त्रीला दुय्यम स्थान होते. धर्माच्या बंधनात तिला अडकवून तिच्यावर अनेक बंधने घातली होती. स्वातंत्र्य, शिक्षण, मानसन्मान, प्रतिष्ठा या सर्वांना ती मुकली होती. पुरूषांची हक्काची दासी अशीच तिची अवस्था होती. आपल्या अभंगांतून संत कवयित्रींनी समाजाच्या या दुष्प्रवृत्तींवर व दांभिकपणावर चौफेर टीका केली. त्यांची अभंगवाणी

महाराष्ट्र सारस्वताचे भूषण ठरली. पुरूषसंतांपासून जरी यांनी प्रेरणा घेतली असली तरी त्यांची अभंगनिर्मिती मात्र स्वतंत्र होती. त्यांचे अभंग स्त्रीच्या दैनंदिन जीवनातील घडामोडींना स्पर्श करणारे आहेत. तत्कालीन समाजवास्तव व स्त्रीचे समाजातील स्थान महानुभाव व वारकरी संत कवयित्रींच्या साहित्यातून समजून घेता येईल.

**महदंबा**

मराठीतील आद्य कवयित्री महदाईसा उर्फ महदंबा तिचा कालखंड साधारणपणे १२३३ ते १३०२ असा सांगितला जातो. मराठीतील आद्य कवयित्रीचा मान महदंबेकडे जातो. महदंबेचे मूळ नाव रूपाई होते. मात्र चक्रधर स्वामींनी ठेवलेले महदाईसा हेच नाव पुढे महानुभाव वाङ्मयात रूढ झाले. नागदेवाचार्यांची चुलत बहिण असलेली महदंबा ही रामदेव उर्फ दादोस यांची शिष्या होती. विधवा झाल्यावर तिचे सर्व आयुष्य स्वामी व गोविंदप्रभू यांच्या सेवत गेले. बुद्धिमान, विरक्त आणि प्रतिभासंपन्न असलेली महादाईसा प्रचंढ जिज्ञासू होती. चक्रधर स्वामींना ती अनेक प्रश्न, शंका कुशंका विचारीत. त्यामुळे चक्रधरांनी तिच्याविषयी गौरोवोद्‌गार काढतांना म्हटले आहे की, 'म्हातारी चर्चक : म्हातारी एथ काही पुसातसी असे.'

मराठीतील आद्य कवयित्री असलेली महदंबा बालविधवा होती. त्यामुळे तिच्या वेदना या अधिक बोलक्या व अनुभवांवर आधारित होत्या. विधवा असलेल्या महदंबेने अध्यात्म स्वीकारून स्वतःच्या आत्मविकासाचा मार्ग शोधला. पतीच्या निधनानंतर सती जाणाऱ्या हिंदू विधवा स्त्रियांसमोर महदंबेने आपल्या रूपाने आदर्श उभा करून त्यांना अध्यात्माची दिशा दाखवली. स्वतःच्या कर्तृत्वाने आत्मविकास करून घेणारी महदंबा ही आदर्श स्त्री होती. तिच्या कार्याचे मूल्यमापन करताना प्रसिद्ध स्त्री अभ्यासिका विद्युत भागवत म्हणतात, 'इंद्रिये जिंकणे हा काही फक्त पुरूषांचा मक्ता नव्हे, हे जणू तिने सिद्ध करण्याचे ठरविले आहे. ती संन्यास घेते. अत्यंत साधे, कष्टाचे आयुष्य स्वीकारते. याचे श्रेय महादंबेला द्यायला हवे.'[२]

महदंबेच्या शुद्ध आचरण व तिने निर्माण केलेल्या उच्च प्रतिच्या आदर्शामुळे पुढे अनेक विधवा स्त्रिया महानुभाव पंथाकडे आकर्षित झाल्या. उपेक्षेचे जीवन नशिबी आलेल्या हजारो हिंदू विधवा स्त्रियांना महदंबेच्या कार्याने प्रेरणा मिळाली. हिंदू स्त्रीसाठी महदंबेचे हे कार्य अलौकिक आहे. पाटवध येथे महदाइसाला चक्रधर स्वामींचे प्रथम दर्शन झाले. 'महंदबेने धवळे, 'मातृकी रूक्मिणी स्वयंवर' आणि 'गर्भकांड-ओव्या' अशी स्वतंत्र रचना केलेली आहे.

**धवळे**

महदंबेने रचलेली धवळे मराठी साहित्यात प्रसिद्ध आहे. या रचनेमुळेच तिला आद्यकवयित्रीचा मान प्राप्त झाला. धवल या संस्कृत शब्दावरून 'धवळा' व 'ढवळा' हा शब्द आलेला आहे. धवळे म्हणजे लग्नात वरविषयक म्हणावयाची गीते. प्राचीन काळी ही गीते विवाहप्रसंगी गायल जात. अतिशय संवेदनशील व भावूक असलेल्या महदंबेने गोविंदप्रभूकडील कृष्णविवाहोत्साहाच्या वेळी करवली म्हणून गायलेले धवळे पुढे मराठी साहित्यात अजरामर झाली.

महदंबेने रचलेली धवळे दोन भागात पूर्वार्ध असून ८३ कडव्यांचा असून तो तिने स्वतः रचला आहे. तर ६५ कडव्यांचा उत्तरार्ध लक्ष्मीधरभटांच्या मदतीने म्हाईभटाने पूर्ण केला आहे.

मातृकी रूक्मिणी स्वयंवर हे ११० अभंगांचे एक आख्यानकाव्य महदाइसेने रचले आहे. या काव्याला 'धवळ्याचा शुद्ध प्रतीध्वनी' म्हटले आहे. 'गर्भकांड काव्य' हे तिचे तिसरे काव्य आहे. महदाइसा शीघ्र काव्याकरिता प्रसिद्ध होती. अंगभूत प्रतिभा, संतांचा आणि विद्वानांचा सहवास आणि जिज्ञासू वृत्ती असलेल्या महदंबेचे नौगाव येथे देहावसान झाले.

**मुक्ताबाई**

वारकरी संप्रदायातील श्रेष्ठ संत ज्ञानेश्वर आणि निवृत्तीनाथांची मुक्ताबाई ही धाकटी बहीण. मुक्ताबाई लहान असली तरी तिची योग्यता सर्वच दृष्टीने मोठी होती. म्हणूनच संत नामदेव तिच्याविषयी म्हणतात, "लहानशी मुक्ताई जशी सणकांडी। केले देशोधडी महान संत." आपल्या अठरा वर्षाच्या आयुष्यात मुक्ताबाईने ३४८ अभंगांची रचना केली. तिचे 'ताटीचे अभंग' विशेष प्रसिद्ध आहेत. घरातूनच मिळालेला अध्यात्मिक वारसा आणि संत ज्ञानेश्वरांच्या विचारांचा आणि सहवासाचा प्रभाव त्यांच्या काव्यनिर्मिती आणि विचारांमधून जाणवतो. मुक्ताबाईची उपलब्ध कविता थोडी असली तरी ती वैशिष्ट्येपूर्ण असून त्यातून तिची प्रतिभा आणि परमार्थसंपन्नता प्रतीत होते.

मुक्ताबाईचे स्वतंत्र चरित्र उपलब्ध नसून ज्ञानेश्वर चरित्रात प्रसंगानुरूप काही उल्लेख येतात. त्यावरून तिच्या विषयीची माहिती आपणास मिळते. तिने केलेल्या अल्प अशा अभंगरचनांमधून ती एक तेजस्वी, स्पष्ट व अधिकार असलेली विदुषी होती याची प्रचीती येते. अहंकार झालेल्या नामदेवाला नमस्कार न करता ती त्याची कानउघडणी करताना म्हणते,

"अखंड जयाला देवाचा शेजार। कां रे अहंकार नाही गेला ?
मान अपमान वाढविसी हेवा। दिवस असता दिवा हाती घेसी।
परब्रम्हासंगे नित्य तुझा खेळ। आंधळ्याचे डोहळे कां बा झाले ?
कल्पतरूतळवटी इच्छिली ते गोष्टी। अद्यापि नरोटी राहिली कां ?
घरी कामधेनु टाक मांगू जाये। ऐसा द्वाड आहे जगामाजी."[३]

तुझा अहंकार गेल्याशिवाय मी तुला नमस्कार करणार नाही अशी सडेतोड भूमिका मुक्ताबाई घेते. ज्ञानेश्वरांच्या समाधी घेण्याच्या निर्णयाने ती दुःखी, कष्टी होते. 'आम्हा माता पिता नित्य ज्ञानेश्वर। नाहीं आता धार विश्रांतीशी' असे म्हणत ती रडू लागते. संवेदनशील आणि कोमल मनाची मुक्ताबाई चांगदेवाला उपदेश करताना कठोर होते आणि म्हणते, 'चौदाशे वर्ष शरीर केले जतन। बोधावीन शीण वाढविला.' मुक्ताबाईच्या दिव्यत्वाचे तिच्या अलौकिकत्वाचे वर्णन करताना संत नामदेव म्हणतात,

होती ऐसी नाही झाली मुक्ताबाई
संत ठायी ठायी स्फुंदताती।

मुक्ताबाईचे ताटीचे अभंग प्रसिद्ध आहेत. ताटीच्या अभंगातून ज्ञानेश्वरांचा रूसवा त्यांनी मोठ्या धिटाईने काढला. ज्ञानेश्वरांना उपदेश करताना मुक्ताबाई म्हणते, 'रागे भरावे कवणाशी। आपण ब्रम्हा सर्व देशी। विश्व रागे जाले वन्ही। संतमुखे

व्हावे पाणी। ताटीच्या अभंगाप्रमाणेच तिच्या काही कुट रचनाही प्रसिद्ध आहेत. मुंगी उडाली आकाशी। तिने गिळिले सूर्याशी। माशी व्याली घार झाली। देखोनी मुक्ताई हांसली। अशा कुट रचना दिसून येतात.

संत ज्ञानेश्वर, निवृत्तीनाथ, सोपान आणि मुक्ताबाई या चाही भावंडांना अल्पायुष्य मिळाले. मात्र आपल्या थोड्या आयुष्यात त्यांनी धार्मिक आणि वाङ्मयीन बाबतीत अतिशय महत्त्वाचे व चिरस्मरणीय असे कार्य करून ठेवले.

**जनाबाई**

स्वतःला नामयाची दासी म्हणवून घेणाऱ्या जनाबाईचा जन्म मराठवाड्यातील गंगाखेड गावातील दमा व करूंड या मातापित्यांच्या पोटी जन्म झाला. पुढे दामशेटने तिचे पालनपोषण केले. वारकरी संप्रदायाची पूर्वापार परंपरा असलेल्या दामशेटच्या घरात आणि नामदेवांच्या सहवासात जनाबाईची भक्ती आणि प्रतिभा फुलत गेली. नामदेवांचा प्रचंड प्रभाव तिच्यावर दिसून येतो. जनाबाई आपले नाते दासीपुत्र असलेल्या महाभारतातील विदूराशी आहे, असे सांगते. आपल्या हक्कांसाठी ती विठ्ठलालाच साकडं घालते. तिच्या अभंगांतून विद्रोह आणि व्यवस्थेच्या विरोधातील बंडखोरी दिसते. तत्कालीन धर्ममार्तंडाच्या संपत्ती कमविणे आणि दक्षिणा घेण्याच्या प्रवृत्तीवर ती टीका करते. चोखामेळा हाच खरा वैष्णव असा निष्कर्ष ती काढते. विठ्ठलाला सखा, माय, बाप, भाऊ अशा विविध रूपांनी ती आळवते.

यातीकुळे नाही त्याला। देव भावेचा भुकेला। असा तिचा दृढ विश्वास आहे. पंढरपूरचा विठ्ठल आपल्या मदतीला येतो आणि आपली हलकी कामे करतात अशी तिची धारणा आहे.

"झाडलोट करी जनी। केर भरी चक्रपाणी।।
साळी सडायास काढी। पुढे जाऊनी उखळ झाडी।
सांडूनिया थोरपण। करी दळण कांडण।।
राना जाये शेणीसाठी। वेंचू लागे विठोबापाठी।
जनी जाई पाणियासी। मागे धावे ऋषीकेशी।।"[४]

नामदेव गाथेत जनाबाईचे ३४७ अभंग संकलित आहे. कृष्णजन्म, बालक्रीडा, नामदेव चरित्र, हरिश्चंद्राख्यान अशा आख्यानपर रचनेबरोबरच पाळणा, काकडआरती, पदे अशा स्फुट रचनाही जनाबाईने केल्या आहेत. आर्तता, आनंद, क्रोध, तर कधी करूणा, अनुताप, विश्वास, संदेह अशा अनेक भावांनी ओथंबलेले जनाबाईचे अभंग वाचकाला हेलावून टाकतात.

**कान्होपात्रा**

मंगळवेढ्याच्या 'शामा' नायकिणीची 'कान्होपात्रा' ही मुलगी. विठ्ठलावरील अपार भक्तीमुळे एका गणिकेची मुलगी असूनही तिने २३ अभंग लिहिले. तिचे अभंग 'सकल संतगाथा' यात उपलब्ध आहेत. बेदरच्या बादशहाची आपल्या दरबारात राहण्याची मागणी धुडकावून ती अध्यात्माचा मार्ग स्वीकारते. विषयवासनेने आयुष्यातून उठलेल्या मोठमोठ्या लोकांची उदाहरणे देवून ती आपणाकडे येणाऱ्या लोकांना ती तरूण वेश्यापुत्री अभंगातून उपदेश करताना म्हणते,

विषयांचे संगती। नाश पावले निश्चिती।

भगे पडले इंदगाला। भस्मासूर भस्म झाला
चंद्रा लागला कलंक। गुरू पत्नीसी रतला देख।
रावण मुकला प्राणासी। म्हणे कान्होपात्रा दासी।।

गणिकेचं जीवन जगणाऱ्या **"कान्होपात्रा"** चा अध्यात्माने कायापालट होतो आणि जीवनाकडे पाहण्याची तिची दृष्टी बदलून जाते. नटवे सौंदर्य, फसवे प्रेम आणि वैषयिकता यांनी बरबटलेल्या जगाचा तिला वीट येतो. मंगळवेढ्यावरून आल्यावर पंढरपूर हेच कान्होपात्राचे माहेर होते. याविषयी आपल्या एका अभंगात ती म्हणते,

"माझे माहेर पंढरी। सुखे नांदू भीमातीरी।
येथे आहे मायबाप। हरे ताप दरूशने।
निवारिली तळमळ चिंता। गेली व्यथा अंतरीची।
कैशी विटेवरी शोभली। पाहुनि कान्होपात्रा धाली।।"[५]

आपल्या वेदनेवर, दुःखावर विठ्ठलाच्या रूपाने ती उपाय शोधते. भक्तीत तल्लीन होते. कान्होपात्राच्या अभंगांतून अनुभवाचे विविधांगी दर्शन घडते.

**सोयराबाई**

नामदेव पंचकातील प्रसिद्ध संत चोखामेळा यांची सोयराबाई ही पत्नी. सोयराबाई सुद्धा प्रसिद्ध कवयित्री होती. जातिभेदाच्या भिंती मजबुतपणे उभ्या असल्या तरी तत्कालीन संतमंडळात चोखोबास मोठा मान होता. सोयराबाईचे ६२ अभंग उपलब्ध आहे. आपल्या अभंगात ती स्वतःचा **'म्हणे चोखयाची महारीन'** असा उल्लेख करते. यावरून तिची पतीनिष्ठा आणि तिच्यावर असलेला चोखोबाचा प्रभाव दिसून येतो. देहाचा विटाळ मानणाऱ्या कर्मठ व सनातनी लोकांची ती कानउघडणी करते. चोखोबाचा पंढरपूरच्या ब्राम्हणांनी केलेला छळ आणि मग देवाने पंढरपूरच्या ब्राम्हणांची कशी खोड मोडली याचेही वर्णन सोयराबाई आपल्या अभंगातून करते. अवघा रंग एक झाला। रंगी रंगला श्रीरंग। यासारखे तिचे अनेक अभंग प्रसिद्ध आहेत. अध्यात्मिक आणि सामाजिक अशी दोन प्रकारची तळमळ तिच्या अभंगामध्ये दिसून येते.

**बहिणाबाई**

औरंगाबाद जिल्ह्यातील देवगाव रंगारी येथे बहिणाबाईचा जन्म झाला. वयाच्या तिसऱ्या वर्षी तीस वर्षाच्या रत्नाकर पाठक या बीजवराशी लग्न झाल्याने तत्कालीन समाजव्यवस्थेतील स्त्री जन्माच्या वेदना बहिणाबाईच्या अतिशय अल्पवयात नशिबी आल्या. संत तुकारामांच्या कीर्तन भजनाने प्रभावित होऊन बहिणाबाईने मनोमन त्यांना गुरू मानले. बहिणाबाईचे पाचशेहून अधिक अभंग उपलब्ध आहेत. त्यांच्या काव्यातून तत्कालीन सामाजिक पद्धती, रितीरिवाज यांची माहिती मिळते. विधवांच्या दुःखी व करूण आयुष्याचे चित्र त्यांच्या अभंगांतून उमटते. नवऱ्याच्या इच्छेविरूद्ध बहिणाबाईने आपल्याला हव्या त्या मार्गाला जाण्याचे ठरविले. तिच्या अभंगांतून तुकाराम चरित्राचे अनेक तपशील मिळतात. या संदर्भात डॉ. सदानंद मोरे म्हणतात, "तुकोबाच्या अन्य कोण्याही समकालीनाने तुकारामाविषयी इतके चरित्रात्मक तपशील पुरवले नाहीत. विशेषतः तुकारामकालीन महाराष्ट्रात तुकोबांचे

स्थान काय होते तेव्हा जे लोक त्यांच्याकडे कोणत्या दृष्टीने पाहत याचा विश्वसनीय वृत्तांत बहिणाबाईच्या अभंगातून मिळतो. बहिणाबाईने या नोंदी केल्या नसत्या तर तुकाराम चरित्रातील महत्त्वाच्या भागाला आपण कायमचे मुकलो असतो."[६] यावरून बहिणाबाईच्या अभंगांचे सामाजिक महत्त्व लक्षात येते.

आद्य कवयित्री महदंबा, मुक्ताबाई, जनाबाई, कान्होपात्रा, सोयराबाई आणि बहिणाबाई यांनी मराठी साहित्याला जसे योगदान दिले तसेच त्यांनी स्त्रीच्या विकासालाही दिले. कर्मकांडात अडकलेल्या स्त्रियांना अध्यात्माचा मार्ग दाखवून त्यांना दिशा देण्याचे सामाजिक काम मध्ययुगातील या मराठी संत कवयित्रींनी केले. संसारात राहूनही जर तुमच्या अंगी चारित्र्य, विनम्रता आणि धैर्य असेल तर स्वत:ची उन्नती साधता येते, हे त्यांनी त्यांच्या स्वत:च्याच उदाहरणांनी सिद्ध केले आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१. महाजन टी. टी., 'मध्ययुगीन भारतातील स्त्री जीवन', य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक, प्र. आ. २००४, पृ. क्र. ११७

२. भागवत विद्युत, 'स्त्री प्रश्नांची वाटचाल', प्रतिमा प्रकाशन पुणे, प्र. आ. २००४, पृ. क्र. ११७

३. आजगावकर ज. र., 'महाराष्ट्र संत कवयित्री', भारत गौरव ग्रंथमाला, कर्नाटक हाऊस, मुंबई, प्र. आ. १९३९, पृ. क्र. ३२

४. संपा. तुळपुळे श. गो., 'मराठी वाङ्मयाचा इतिहास', खंड पहिला, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे - ३०, प्र. आ. १९८४, पृ. क्र. ६४०

५. उनी, आजगावकर ज. र., 'महाराष्ट्र संत कवयित्री', पृ. क्र. ८४

६. संपा. पाटंगकर विद्यासागर, 'मराठी संतकवयित्रींचा इतिहास', साहित्य अकादमी, नवी दिल्ली, प्र. आ. २०१५, पृ. क्र. ११४